<u>विशेष दिवाणी दावा क्र.१५०/२०१९ मधील निशाणी क्रमांक १८ वरील आदेश</u>

**<u>CNR No.MHSN02-001296-2019</u>**

१. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी सदरचा दावा चालविण्याचे अधिकार क्षेत्र दिवाणी कोर्टाला येते का, अशा आशयाचा प्राथमिक मुद्दा निश्चित करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्जाला अनुषंगून वादी यांनी नि.क्र.१९ कडे त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यामध्ये दाव्याचे स्वरुप पाहता सदरचा दावा हा चालविण्यापासून दिवाणी कोर्टाला प्रतिरोधीत करता येत नाही असे कथन करुन त्यांनी प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

३. अर्जाला अनुसरुन उभय पक्षातर्फे युक्तीवाद ऐकला.

४. वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी दावा मिळकती संदर्भात दिनांक १४/१०/२०१६ रोजी साठे करारपत्र केले होते. परंतु प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या म्हणण्याप्रमाणे याच दावा मिळकती संदर्भात प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक २८/०१/२०१६ रोजी त्यांच्याकडे गहाणखत केले होते व त्या संदर्भात प्रतिवादी हे वसुली प्रक्रिया करत आहेत. त्यामुळे सदरहु मिळकती या साठेकरारापूर्वीच गहाण टाकलेल्या असल्यामुळे वादींनी ज्या प्रकारची मागणी केली आहे तशी मागणी दिवाणी कोर्टाला करता येवू शकत नाही.

५. निर्विवादपणे वादींनी ज्या स्वरुपाचा दावा दाखल केलेला आहे. तो दावा दिवाणी कोर्टाला चालविता येतो. परंतु प्रतिवादींनी केलेल्या तक्रारी देखील दुर्लक्षीत करता येण्यासारख्या नाहीत. त्यामुळे सदरचा दावा दिवाणी कोर्टाला चालविता येण्याचे अधिकार आहेत किंवा नाहीत ही बाब गुणदोषावर विचारात घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचा नि.क्र.१८ कडील अर्ज मंजूर करणे गरजेचे ठरते. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचा नि.क्र.१८ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे व त्याला अनुसरुन खालील प्राथमिक मुद्दा निश्चित करण्यात येत आहे.

२. सदरचा दावा चालविण्याचे अधिकार क्षेत्र दिवाणी कोर्टाला येते का ? असा प्राथमिक मुद्दा काढण्यात येतो.

३. प्राथमिक मुद्दयाला अनुसरुन उभय पक्षकारांनी व वकीलांनी युक्तीवाद करावा.

सही/---

**सांगली.** **(अ. अ.मेहेंदळे)**

**दिनांकः ०७.१२.२०२१** **चौथे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | चौथे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०७/१२/२०२१ |
| पी. डी. एफ. चा दिनांक | - | ०७/१२/२०२१ |